| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०२.०९.२०२३. |
| नोंदणी दिनांक | : | ०२.०९.२०२३. |
| निकाल दिनांक | : | २४.०४.२०२६. |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०२ ०७ २२ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कुरुंदवाड, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी – श्री. बाळासाहेब श्री. गायकवाड)**

**प्रपत्र क्र.३२ भाग 'अ'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i)]**

| | | |
|---|---|---|
| MHKO180006712023 | | (जाहीर दिनांक – २४.०४.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ५७/२०२३.**<br>CNR No. MHKO18-000671-2023.<br>**निशाणी क्र.४६.** |
| **गुन्ह्याचा तपशिल** | | पोलीस ठाणे, कुरुंदवाड, गुन्हा क्र.१४/२०२३,<br>भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ३३६, ३३७ व ५०४ सह कलम १४९. |
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, कुरुंदवाड. |
| **अभियोगपक्षातर्फे** | | **श्री. सं.सि.नदाफ, विद्यमान सहा. सरकारी अभियोक्ता** |
| **आरोपी** | १. | **गुरु रमेश शिकलगार,**<br>वय : ३५ वर्षे, व्यवसाय : सेंट्रींगकाम, |
| | २. | **संजय रमेश शिकलगार (मयत),** |
| | ३. | **पंकज रमेश शिकलगार,**<br>वय : २५ वर्षे, व्यवसाय : सेंट्रींगकाम, |
| | ४. | **राकेश शिवाप्पा शिकलगार,**<br>वय : ३६ वर्षे, व्यवसाय : सेंट्रींगकाम, |
| | ५. | **अनिल राजू शिकलगार,**<br>वय : २९ वर्षे, व्यवसाय : पेटींगकाम, |
| | ६. | **परशुराम उर्फ प्रकाश अब्दुल शिकलगार,**<br>वय : ३५ वर्षे, व्यवसाय : सेंट्रींगकाम,<br>आरोपी क्र.१, ३ ते ६ राहणार शिकलगार वसाहत, कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |

| | |
|---|---|
| **आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्यातर्फे** | **श्री. इम्रान ज. घोरी, विद्यमान वकील.** |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'ब'**
**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]**

| **गुन्ह्याचा तपशिल** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | १५.०१.२०२३ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | १६.०१.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | ०२.०९.२०२३ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | २१.०७.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | १६.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | २४.०४.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | -- |

**आरोपींचा तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गुरु रमेश शिकलगार | -- | १५.१२.२०२३ | भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ३३६, ३३७ व ५०४ सह कलम १४९ | निर्दोष | – | – |
| ३. | पंकज रमेश शिकलगार | -- | १५.१२.२०२३ | | निर्दोष | – | – |
| ४. | राकेश शिवाप्पा शिकलगार | -- | १५.१२.२०२३ | | निर्दोष | – | – |
| ५. | अनिल राजू शिकलगार | -- | १५.१२.२०२३ | | निर्दोष | – | – |
| ६. | परशुराम उर्फ प्रकाश अब्दुल शिकलगार | -- | १५.१२.२०२३ | | निर्दोष | – | – |

प्रपत्र क्र.३२ भाग 'क'
[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]
सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | तुषार नामदेव शिकलगार | तक्रारदार | ४० |
| २. | अशोक संभाजी शिकलगार | जखमी साक्षीदार | ४१ |
| ३. | रेखा नामदेव शिकलगार | जखमी साक्षीदार | ४२ |
| ४. | नामदेव संभाजी शिकलगार | जखमी साक्षीदार | ४३ |

ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३९ | तक्रारदार, जखमी साक्षीदार अशोक आणि आरोपी क्र.१, ३ व ६ यांची संयुक्त तडजोड पुरसीस |

ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १/१. | ओबडधोबड आकाराचा एक दगड. |

| | | |
|---|---|---|
| २. | १/२ | ॲल्युमिनीअमचा एक डबा. |
| ३. | १/३ व १/४ | ओबडधोबड आकाराचे वीटेचे दोन तुकडे. |
| ४. | १/५ व १/६ | बांबुच्या दोन काठया. |

## न्या य नि र्ण य

(अधिघोषित दिनांक २४.०४.२०२६)

प्रस्तुत खटल्याद्वारे आरोपी क्र.१, ३ ते ६ यांची भारतीय दंड संहिताचे कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ३३६, ३३७ व ५०४ सह कलम १४९ या आरोपाखाली संपरिक्षा घेण्यात आली.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन** :–

०२. दिनांक १५.०१.२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताच्या सुमारास मौजे कुरुंदवाड येथील शिकलगार वसाहतीतील रस्त्यावर आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमविला. घटनेवेळी आरोपी क्र.१ याने तक्रारदार यांना शिवीगाळ केली. आरोपी क्र.३ याने फेकून मारलेला दगड तक्रारदार यांच्या उजव्या हातावर लागून त्यांच्या सदर हाताला जखम झाली. आरोपी क्र.६ याने त्याच्या हातातील जेवणाचा डबा साक्षीदार नामदेव शिकलगार यांच्या डोक्यात मारुन त्यांना जखमी केले. आरोपी क्र.२ याने फेकून मारलेली वीट साक्षीदार अशोक यांच्या डोक्यास व नाकास लागून त्यांना जखमी केले. आरोपी क्र.४ याने साक्षीदार रेखा यांच्या डाव्या मांडीवर, डोक्यात व पाठीत मारहाण केली. तसेच, घटनेवेळी आरोपी क्र.५ याने केलेल्या दगडफेकीत साक्षीदार सुधीर शिकलगार यांना दुखापत झाली. त्यानंतर, तक्रारदार यांनी घटनेबाबत आरोपी क्र.१, ३ ते ६ यांविरुद्ध पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरुन पोलीस ठाणे, कुरुंदवाड येथे आरोपी क्र.१, ३ ते ६ यांविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम १४३, १४७, ३२३, ३२४ व ५०४ सह कलम १४९ या आरोपाखाली गु.र.क्र.१४/२०२३ नोंदविण्यात आला व पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय रामचंद्र घाटगे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती आरोपी क्र.१, ३ ते ६ यांविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ३३६, ३३७ व ५०४ सह कलम १४९ या आरोपाखाली न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०३. प्रस्तुत प्रकरणा प्रलंबीत असतेवेळी आरोपी क्र.२ हा मयत झाल्यामुळे दिनांक ०८.०५.२०२५ रोजीच्या निशाणी क्र.१ वरील आदेशानुसार प्रस्तुतचा खटला आरोपी क्र.२ याच्याविरुध्द उपशम करण्यात आला. दिनांक २१.०७.२०२५ रोजी आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्याविरुध्द १४३, १४७, ३२३, ३२४, ३३६, ३३७ व ५०४ सह कलम १४९ या आरोपाखाली निशाणी क्र.२१ वर दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपी क्र.१, ३ ते ६ यांना त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता त्यांनी उक्त दोषारोप नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०४. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | घटनेवेळी आरोपी क्र.१, ३ ते ६ हे मयत आरोपी क्र.२ याच्यासह बेकायदेशीर जमावाचे सभासद होते, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| २. | घटनेवेळी आरोपी क्र.१, ३ ते ६ यांनी मयत आरोपी क्र.२ याच्यासह बेकायदेशीर जमाव जमवून दंगा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ३. | आरोपी क्र.१, ३ ते ६ यांनी घटनेवेळी मयत आरोपी क्र.२ याच्यासह बेकायदेशीर जमाव जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी तक्रारदार यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केले, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ४. | आरोपी क्र.१, ३ ते ६ यांनी घटनेवेळी मयत आरोपी क्र.२ याच्यासह बेकायदेशीर जमाव जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी तक्रारदार, साक्षीदार नामदेव, संजय, अशोक, रेखा व सुधीर यांना दगड, वीट व काठी या घातक हत्यारांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहचविली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ५. | आरोपी क्र.१, ३ ते ६ यांनी घटनेवेळी मयत आरोपी क्र.२ याच्यासह बेकायदेशीर जमाव जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी तक्रारदार व साक्षीदारांना दगड, वीट व काठीने फेकून मारून त्यांचे जिवीत किंवा व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात आणणारी कृती केली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६. | आरोपी क्र.१, ३ ते ६ यांनी घटनेवेळी मयत आरोपी क्र.२ याच्यासह बेकायदेशीर जमाव जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी तक्रारदार व साक्षीदारांना दगड, वीट व काठीने फेकून मारून त्यांचे जिवीत किंवा व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात आणणारी कृती करुन त्यांना दुखापत पोहोचवीली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ७. | आरोपी क्र.१, ३ ते ६ यांनी घटनेवेळी बेकायदेशीर जमाव जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी तक्रारदार व साक्षीदार अशोक यांना ईच्छापूर्वक शिविगाळ करुन प्रक्षोभीत केले ज्यायोगे असे प्रक्षोभन तक्रारदार व अशोक यांना शांततेचा भंग करण्यास किंवा इतर कोणताही गुन्हा करण्यास प्रवृत्त करणारे होते, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ८. | आदेश काय ? | ...आरोपी क्र.१, ३ ते ६ यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०५. आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्याविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने तक्रारदार आणि जखमी साक्षीदार अशोक (अ.सा.२), रेखा (अ.सा.३) व नामदेव (अ.सा.४) यांची साक्ष अनुक्रमे निशाणी क्र.४० ते ४३ वर नोंदविली आहे. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसून प्रस्तुत प्रकरणात त्यांची आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कथन केले आहे. तसेच, तक्रारदार व अशोक (अ.सा.२) यांनी आरोपी क्र.१, ३ व ६ यांच्यासमवेत निशाणी क्र.३९ वर संयुक्त तडजोड पुरसिस दाखल केली आहे. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने उर्वरित साक्षीदारांना साक्षीपुराव्याकामी न्यायालयासमक्ष हजर केले नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. अभियोगपक्षाने आरोपी क्र.१, ३ ते ६ यांना प्रस्तुत गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपी क्र.१, ३ ते ६ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ आणि आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्यातर्फे विद्यमान वकील श्री. इम्रान ज. घोरी यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

**<u>मुद्दा क्र.१ ते ७ करीता</u>** :–

०७. उपरोक्त मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे व त्यावरील अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा एकसारखा असल्यामुळे साक्षीपुराव्याचा पुनरुच्चार टाळण्याकरीता सदर मुद्दे एकत्रीतरित्या विवेचनाकरीता घेण्यात येत आहेत.

०८. तक्रारदार यांनी दिनांक १५.०१.२०२३ रोजी आरोपींसोबत त्यांचा किरकोळ वादविवाद झाल्यामुळे त्यांनी रागाच्या भरात आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केल्याचे कथन केले आहे. तक्रारीवरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

०९. अशोक (अ.सा.२), रेखा (अ.सा.३) व नामदेव (अ.सा.४) यांनी प्रस्तुत प्रकरणातील घटनेबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे कथन केले आहे. पोलीसांनी घटनेबाबत त्यांच्याकडे चौकशी केली नसल्याचे व त्यांचा जबाब नोंदविला नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

१०. अभियोगपक्षाच्या कथनानुसार, तक्रारदार, अशोक (अ.सा.२), रेखा (अ.सा.३) व नामदेव (अ.सा.४) हे प्रस्तुत प्रकरणातील जखमी साक्षीदार आहेत. त्यामुळे, अभियोगपक्षाच्या दृष्टीने सदर साक्षीदारांची साक्ष घटनेचे स्वरुप व आरोपींचे कृत्य शाबीत करण्याकरीता महत्वाची ठरते. परंतु, सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसुन आरोपींविरुध्द कोणताही ठोस पुरावा दिला नाही. उपरोक्त नमूद साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्यातून तोंडी तक्रार सिध्द करता आली नाही. तसेच, तक्रारदार, अशोक (अ.सा.२), रेखा (अ.सा.३) व नामदेव (अ.सा.४) यांच्या साक्षीपुराव्यातून अभियोगपक्षास आरोपींचे कृत्य व तथाकथित घटना सिद्ध करता आली नाही. अभियोगपक्षाने उपरोक्त नमूद साक्षीदारांव्यतिरीक्त अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही.

११. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, तक्रारदार, अशोक (अ.सा.२), रेखा (अ.सा.३) व नामदेव (अ.सा.४) यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि

न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कथन करुन तक्रारदार व अशोक (अ.सा.२) यांनी आरोपी क्र.१, ३ व ६ यांच्यासमवेत निशाणी क्र.३९ वर संयुक्त तडजोड पुरसिस दाखल केल्यामुळे अभियोगपक्षास आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्याविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष तसेच सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. सबब, अभियोगपक्षास आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्याविरुध्द ठेवण्यात आलेल्या अपराधांची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. त्यामुळे, मुद्दा क्र.१ ते ७ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.८ करीता** :–

१२. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपी क्र.१, ३ ते ६ यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपी क्र.१, ३ ते ६ यांना संशयाचा फायदा देऊन सदर आरोपी क्र.१, ३ ते ६ यांची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.८ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

:: **आ दे श** ::

१. आरोपी क्र.१ गुरु रमेश शिकलगार, आरोपी क्र.३ पंकज रमेश शिकलगार, आरोपी क्र.४ राकेश शिवाप्पा शिकलगार, आरोपी क्र.५ अनिल राजू शिकलगार व आरोपी क्र.६ परशुराम उर्फ प्रकाश अब्दुल शिकलगार यांची भारतीय दंड संहिताचे कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ३३६, ३३७ व ५०४ सह कलम १४९ या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.१, ३ ते ६ यांचे जामीन कद्बे अपीलीय कालावधीनंतर रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमाल ओबडधोबड आकाराचा एक दगड, ॲल्युमिनीअमचा एक डबा, ओबडधोबड आकाराचे वीटेचे दोन तुकडे व बांबुच्या दोन काठया ह्या मूल्यहीन व निरुपयोगी असल्यामुळे सदर मुद्देमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.04.24 17:11:04 +0530

दिनांक : २४.०४.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.